# MT EDUCARE LTD.

**QUEST- II (Semi Prelim - II)**
**2017 - 18**

**पाठ -** ७ ते १२, **पद्य -** ५ ते ७, **स्थूलवाचन -** ३, ४
**व्याकरण, -** शब्दाच्या जाती, वाक्‌यप्रचार, काळ, प्रयोग, वाक्यरुपांतर, लिंग, वचन, समानार्थी, विरुद्धार्थी

---

**CBSE - X** | **Set - A**

**Roll No.** [ ][ ][ ][ ][ ][ ][ ] | **Code No. 52/1**

**Series LRH/1**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| • | खण्ड : क | : | १. अपठित गद्‌य उतारा<br>२. अपठित गद्‌य उतारा | 13 गुण |
| • | खण्ड : ख | : | रचनात्मक लेखन<br>१. निबंध लेखन<br>२. संवाद लेखन<br>३. पत्र लेखन | 13 गुण |
| • | खण्ड : ग | : | व्याकरण | 18 गुण |
| • | खण्ड : घ | : | साहित्य : गद्‌य, पद्‌य, स्थूलवाचन | 36 गुण |

***Time allowed* :** 3 hours | ***Maximum Marks* :** 80

## MARATHI

**General Instructions :**

(१) चार खंड आहेत - क, ख, ग आणि घ.

(२) सूचनेप्रमाणे सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

(३) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवावेत.

**खंड 'क'**

**Q.1. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

आई आणि वडील ही जीवनातील दोन सामर्थ्ये होत. भारतीय संस्कृतीत राष्ट्र, आचार्य, अतिथी, माता आणि पिता हे परम आदराचे विषय मानले आहेत. 'राष्ट्र देवो भव। आचार्य देवो भव' या मंत्राप्रमाणेच 'मातृ देवो भव । पितृ देवो भव' ही संस्कारसूत्रे शिरोधार्य मानली आहेत. कधी राष्ट्राला मातृभूमी म्हटले जाते, पितृभूमीही मानले जाते.

कोणाच्या जीवनावर आईचा, तर कोणावर वडिलांचा प्रभाव अधिकप्रमाणात आढळतो. जन्मपूर्व अवस्थेपासून माणसाला पाय फुटेपर्यंत तो आईच्या पुढ्यात असतो. ज्या वयात आधाराशिवाय जगता येत नाही त्या वयात हा एकमेव आधार असतो. त्या बाळाचे जीवन ही 'आई' या वृक्षाची पारंबी असते. पुढे वाढीच्या वयात घर मागे पडते व आई घरात राहते. मुलाचे मन हे आईचे घर बनते. मोकळ्या मैदानावर, उघड्या जगात, सामाजिक संदर्भात वडिलांची सोबत घडू लागते. मुलाच्या नावापुढे वडिलांचे आणि आईचे नाव लिहिले जाते. आईने वडिलांचे नाव पत्करलेले असते. वडिलांनी वाडवडिलांचे नाव स्वीकारलेले असते. ते मुलांपुरते वडिलार्जित होते.

आईच्या नावापुढे पदवी असेलच असे नाही. कधी ती नोकरी करणारी असते तर कधी नसते. त्यामुळे तिचे कधी वेगळे उत्पन्न असते तर कधी नसते. आपल्या वेगळेपणाचा त्याग करून मोकळेपणाने घरासाठी सर्वस्व अर्पण करणारी घरवेडी आई ही गृहदेवता असते', गृहलक्ष्मी असते. तिच्याकडे कोणाचे लक्ष नसले तरी ती सर्वांकडे लक्ष देते. कुठून येते हे बळ तिच्यात ? बहुतेक तिच्या आईकडून प्राप्त होणारे ते मातृधन असावे.

**प्रश्न :**

१. 'अतिथी' या शब्दाचा अर्थ खालील पर्यायापैकी कोणता आहे ? **1**

अ) जास्त ब) तारीख क) पाहुणा ड) भूतकाळ

२. सर्वसामान्यपणे व्यक्तीच्या जीवनावर कोणाचा प्रभाव पडतो ? **1**

अ) आई किंवा वडिलांचा ब) संस्कृतीचा

क) पैशाचा ड) थोर पुरूषांचा

३. मुलाला 'आई' या वृक्षाची पारंबी का म्हटले आहे ? **2**

४. आईला गृहदेवता का म्हटले आहे ? **3**

**Q.2. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

दापोली मोठे सुंदर गाव आहे. तेथील हवा फार आरोग्यदायक आहे. तेथून समुद्र चार कोस दूर आहे. दापोलीस खूप मोठ मोठी मैदाने आहेत. एके काळी येथे इंग्रजांची फलटण होती. म्हणून दापोलीस 'कॅम्प दापोली' असेही म्हणतात. यांचा काप असा अपभ्रंश झाला व हल्ली 'कापदापोली' असे म्हणतात. तसे पाहिले तर हा तालुका इंग्रजांच्या ताब्यात इतर महाराष्ट्राच्या आधी गेला. नानासाहेब पेशव्यांनी आंग्रे यांचे आरमार इंग्रजांच्या मदतीने बुडविले. फारच मोठी चूक होती ती. आंग्रे यांच्या आरमाराचा इंग्रजांना पायबंद होता. इंग्रजांच्या व इतरांच्या आरमाराचा आंग्रे यांनी अनेकदा अरबी समुद्रात पराभव केला होता. शिवाजी महाराजांनी मोठ्या प्रयत्नाने आरमार उभारले होते. पूर्वी मराठ्यांचे एक होडूकही

अरबी समुद्रात फिरकत नव्हते; परंतु या महापुरुषाने आरमाराचे महत्त्व ओळखले होते. 'ज्याचा दर्या त्याचे वैभव', हे सूत्र त्यांच्या राजनितीत सांगितलेले आहे; परंतु नानासाहेबांनी इंग्रजांना आंग्रे यांचे आरमार नाहीसे करण्यात जी मदत केली, त्याचा मोबदला म्हणून जो मुलूख मिळाला त्यात बाणकोट, दापोली वगैरे बंदरकाठी गावे होती.

**प्रश्न :**

१. नानासाहेब पेशव्यांनी काय केले? **1**

२. यापूर्वी दापोली येथे आरमार कोणी उभारले होते? **1**

३. दापोली गाव कसे आहे व त्यास 'कापदापोली' का म्हणतात? **2**

४. शिवाजी महाराजांच्या राजनितीत कोणते सूत्र सांगितलेले आहे ? **1**

५. दापोलीपासून समुद्र किती दूर आहे ? **1**

## खंड 'ख'

**Q.3. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा. (कोणतेही एक)** **8**

**१. विज्ञानाचे महत्त्व**

**मुद्दे :-** विज्ञान एक वरदान - विज्ञानामुळे मानवाला झालेला फायदा - मिळालेली शक्ती - नवीन शोध, निर्मिती औद्योगिक क्रांती - अंतराळाचा विस्तार, समुद्राची खोली यांची माहिती - वैद्यकीय प्रगती, यंत्रमानव - सुखसोयी - आयुष्यात नाविन्यता - ज्ञानाचा विस्तार - शेवट

**२. परीक्षा रद्द झाल्या तर ....**

**मुद्दे :-** एक मजेदार कल्पना - परीक्षांचे विविध प्रकार - परीक्षांमुळे विद्यार्थ्यांवर येणारी बंधने - परीक्षा नसल्यामुळे होणारे फायदे-तोटे - परीक्षांची आवश्यकता.

**३. किल्ल्याचे आत्मवृत्त**

**मुद्दे :-** गौरवशाली इतिहास - थोर व्यक्तींचा सहवास - समाधान - वर्तमानातील अनुभव - वैभवाचा नाश - दु:ख.

**Q.4. दिलेले मुद्दे वाचून त्यावर कथालेखन करा.** **5**

**मुद्दे :** रामा हुशार व स्वाभिमानी – आजारी पडणे – सहामाही परीक्षेत नापास – वर्गात अपमान – जिद्दीने अभ्यास – शालान्त परीक्षेत पहिला – शाळेकडून कौतुक – तात्पर्य.

**किंवा**

**खालील विषयांवर संवाद लेखन करा.**

ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर गुरुजी व विद्यार्थ्यांमध्ये सुरू असलेला संवाद लिहा.

## खंड 'ग'

**Q.5. अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा.** **5**

१. झटपट काम करावे. (क्रियाविशेषण अव्यय ओळखा.)
२. आईदेखील गावाला गेली. (शब्दयोगी अव्यय ओळखा.)
३. झाडाला खत घातले पण फुले आली नाहीत. (उभयान्वयी अव्यय ओळखा.)
४. येथे अशुभाची सावली कशी पडेल? (विधानार्थी करा.)
५. स्वामीजींनी कोच्चूचे खूप कौतुक केले. (उद्‌गारार्थी करा.)

**Q.5. आ) प्रयोग बदला.** **3**

१. मास्तरांनी अनेकांची पुस्तके प्रकाशीत केली. (कर्तरी प्रयोग करा.)
२. सणगर समाज घोंगड्या विकतो. (कर्मणी प्रयोग)
३. राजू फुलपाखरू पकडतो. (भावे प्रयोग)

**Q.5. इ) काळ ओळखा.** **2**

१. तिने पोळ्या लाटल्या.
२. मी काम करत आहे.

**Q.5. ई) लिंग बदला.** **2**

१. पाहुणा २. सेवक
३. युवक ४. चिमणा

**Q.5. उ) वचन बदला.** **2**

१. झोपडी २. जात
३. कविता ४. नकाशा

**Q.5. ऊ) समानार्थी शब्द लिहा.** **1**

१. भीती २. पृथ्वी

**Q.5. ए) विरूद्धार्थी शब्द लिहा.** **1**

१. पवित्र २. धर्म

**Q.5. ऐ) पुढील वाक्यात कंसातील योग्य वाक्प्रचार वापरुन वाक्य पुन्हा लिहा.** **2**
**(दंगा करणे, हैराण करणे, कहर करणे)**

१. मुले विनाकारण मुक्या प्राण्यांना त्रास देतात.
२. शहरात सध्या सिमेंटचा जंगलांनी अतिरेक केला आहे.

**खंड 'घ'**

**Q.6. अ) खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : (कोणतेही एक)** **4**

१. 'निखळ आनंद घेताना धर्माच्या भिंतींनी कधी अडसर केला नाही.'
२. 'माझं मन सारखं कुठेतरी भटकत होतं.'
३. कारण माझा उपयोग जे व्यवस्थित करतात, तेच मोठे होतात, ज्ञानी होतात, विद्वान होतात.

**Q.6. आ) योग्य पर्याय शोधून विधान पूर्ण करा.** **1**

१. बाबांचं घराणं ...........

(मालगुजाराचं, श्रीमंताचं, धनवानाचं, प्रतिष्ठित)

**Q.7. अ) खालील प्रश्नांची उत्तरे सुमारे ५०-६० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन)** **8**

१. नागिणीचे शहाणपण कोणत्या प्रसंगातून दिसून येते?
२. आनंदवन कसं निर्माण झालं?
३. निसर्गाला नित्यनव्याचा सोस असतो, असे का म्हटले आहे?
४. रंगमंचावर आलेल्या पुस्तकरावाच्या पोशाखाचे वर्णन करा.

**Q.7. आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **2**

१. केशवचा स्वभाव कसा आहे?
२. पन्हाळ्याचा दरगाह कशाचे पवित्र स्थान आहे?

**Q.8. अ) खालील पद्यपंक्तींचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा : (कोणतेही एक)** **4**

१. सोसून सोसून किती गं सोसावं,
गिळून दु:ख सारं, साऱ्या जगा पोसावं
२. वळण वाकड्या नदीत आहे खळखळते पाणी
नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी
३. 'नभी फडफडे उंच तिरंगा, मनात गंगा, हिमनग रांगा
चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख प्रणाम ।।'

**Q.8. आ) खाली दिलेल्या पद्यपंक्तीतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरून ती पद्यपंक्ती पुन्हा लिहा :** **1**

१. गिळून ..... सारं साऱ्या जगा पोसावं. (सुख, दु:ख, मन, त्रास)

**Q.9. अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा : (कोणतेही दोन)** **8**

१. कवीला गावातील आमराई, नदी, शेत का आवडते ?
२. कवयित्रीने एकत्वाचे कोणते विचार कवितेतून व्यक्त केले आहेत?
३. कवीच्या मते स्त्रीने आपले हक्क मिळविण्यासाठी काय करावे?
४. कवयित्रीने आपल्या देशातील वेगळेपण कसे वर्णिले आहे?

**Q.9. आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **2**

१. कवीच्या डोळ्यांपुढे काय येते?

२. कवितेत स्त्रीला समता निर्माण व्हायला काय करावे असे वाटते?

**Q.10. अ) खालील पठित उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** **4**

''आपण क्लासला जातो ना त्या वेळेत एक आजोबा सारखे बागेतल्या मुलांना हाका मारत असतात. 'अरे, जरा या, माझं ऐका' म्हणत असतात. त्यांना फार दिसत नाही. संध्याकाळच्या वेळेत तर खूप कमी दिसतं. त्यांना वाटतं की कुणीतरी त्यांना पेपरमधल्या बातम्या वाचून दाखवाव्यात. मला वाटतं रे त्यांना मदत करावी.. आणि आमच्या क्लासमध्ये स्वच्छता करायला अंबूमावशी येतात. त्यांनी स्वच्छता केली की मुलं पुन्हा कचरा टाकतात. मला त्यांनाही केर काढण्यात मदत करावी वाटते... शिवाय आईला स्वयंपाकात, भाजी आणण्यात, बाबांना भांडी घासायला, दांडीवरचे वाळलेले कपडे घडी करून ठेवायला मदत करावी वाटते....पण वेळच कुठं असतो ?'' - जुई

**प्रश्न**

१. तुमच्या वैयक्तिक जीवनात तुम्ही इतरांना कशी मदत करता ते लिहा.

**Q.10. आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** **2**

१. पंढरपूरातील कोणत्या नदीला पावित्र्याचा स्पर्श आहे?

२. लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना वडिलांनी त्यांच्यावर कोणती जबाबदारी सोपवली होती?

***Best of Luck*** 👍